Vol 5 Issue 7 Jan 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN: 2231-5063 | Impact Factor : 3.4052(UIF) | Volume - 5 | Issue - 7 | Jan - 2016





# पर्यावरणीय नीतीविषयक समस्या

मिलींद मा. तलवार

## प्रस्तावना

सर्व मानवजातीला भेडसावणा-या हया समस्येचा तत्त्वज्ञानाचा अभ्यासक हया नात्याने परामर्श घेण्याचा एक प्रमाणिक प्रयत्न प्रस्तुत निबंधात करण्यात आला आहे . पण मुळातच या क्षेत्रात तत्त्वचिंतकाला काही जागा आहे का अशी शंका येऊ शकते . माझ्या मते इथे तत्वचिंतक महत्वाची भुमिका बजावु शकतो . त्याची तीन कारणे आहेत एक म्हणजे तत्वचिंतनाला कोणताच विषय वर्ज्य नसल्याने पर्यावरणाचाही विचार त्यात येऊ शकतो . दुसरे सर्व मानवजातीला भेडसवर्णा या या समस्येचा सांगोपांग विचार करणे हे सामाजिक बांधिलकी म्हणून तत्वचिंकाचे कर्तव्य आहे तिसरे व सर्वात महत्वाचे म्हणजे या निबंधात आपण पाहाणार आहेत त्यानुसार पर्यावरण समस्याही सर्वार्थाने मानवी समस्या आहे आणि ती सोडवायची आसेल तर ‘आपण खरोखर कोण आहोत ॠ’ हया सनातन प्रश्नाचा एकवार पुनर्विचार करावा लागेल .

सध्याच्या उपाययोजना तात्कालिक धोरणे तात्पुरत्या मलमपट्टी छाप टाकुन खरी परिणामकारक उपाययोजना आखायची असेल तर पर्यावरण नीती विकसित करायची असेल तर तत्वचिंतकाच्या भुमिकेतुन त्या समस्येला सामोरे जाऊन ती समजावुन घेऊन मगच नीती व उपाययोजना यांचा विचार योग्य ठरू शकेल .

आधुनिक काळामध्ये गेल्या काही दशकांमध्ये पर्यावरणाबाबतची जागृती वाढत आहे . आधुनिक काळामध्ये पर्यावरणाच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण झाल्या . अनेक प्रकारची प्रदुषणे वाढली त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडला हवा प्रदुषण सागरी प्रदुषण हयामुळे मानवाच्या आरोग्यावरही परिणाम झाला .

निसर्गाला आंकित करा . निसर्गाला मानवाने आपल्या ताब्यात ठेवले नाही तर मनुष्य प्रगती करू शकणार नाही . हे विकास करर्णायांचे एक टोक तर त्याला उत्तर म्हणुन ‘निसर्गात अजिबात ढवळा ढवळ करू नका’ हे पर्यावरणवाद्यांनी दुसरे टोक गाठले . या दोन धृवांमध्ये राहुन निसर्ग जपत विकास करणे हे आपले कर्तव्य आहे असा मधला मार्गही काहींनी गाठला .

पर्यावरण व विकास हयाच्यामध्ये अव्द्वैत साधेल असा व्यापक विचारच पर्यावरणवादातील तिसरी लाट आणु शकेल .

पर्यावरणाच्या समस्या हया मानवी समस्या आहेत व त्या सोडविण्यासाठी पर्यावरण नीती चा आभ्यास करणे आवश्यक आहे . पर्यावरण नीती म्हणजे काय ? पर्यावरणाचा अभ्यास करणारे ‘पर्यावरण शास्त्र (Ecology) या ज्ञानशाखेचे ह्यश्र्ल्ल्ग्यि्ह हे नाव प्रथम ई . एच हेकेल यांनी उयोगात आणले पुढे या ज्ञानशाखेचा शास्त्रशुध्द अभ्यास पेट्राइडस यांनी केला . पर्यावरणशास्त्रला ‘ परिस्थितीकी विज्ञान असेही म्हणटले जाते . पर्यावरणशास्त्राचा विविध अंगानी आज अभ्यास होवु लागला आहे त्यातील एक प्रमुख अंग म्हणजे ‘पर्यावरण नीती’ हे होय . पर्यावरण नीती म्हणजे या पृथ्वीतलावरच्या सर्व जीवसृष्टीवर सध्या जे प्राणघातक संकट ओढावले आहे . त्याचा यथार्थ अभ्यास करून त्यावर कोणत्या उपाय योजना करता येतील हयाबाबत विचार विनिमय करणे व त्याची प्रत्यक्ष कार्यवाही व्यवहारात करणे म्हणजे पर्यावरण नीतीशास्त्र होय . हयावरून नीतीची व्याख्या पुढिलप्रमाणे करता येईल .

“संपूर्ण मानवजातीचे निसर्गसृष्टीशी असलेले मानवाला उपकारक ठरणारे नाते बिघडु न देण्याची खबरदारी घेणारा मानवी वर्तनव्यवहार किंवा आचरण म्हणजे पर्यावरण नीती होय .”

हया पृथ्वीवरील मानव जातीसह इतर सर्व प्राणी जातींचा विनाश टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा सुव्यवस्थित अभ्यास करणे म्हणजे पर्यावरण नीती होय . पार्यावण नीतीमध्ये निसर्ग आणि मानव हयांचे विवेचन करावे लागते . निसर्ग आणि मानव हयांच्यामधील संबंध हा समतोल राखणारा असावा लागतो . मानव व निसर्ग हयांचा अतुट संबंध आहे . मनुष्य हा नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून आपली उपजीविका करतो व विकास करतो .

प्राचिन काळी मानव हा निसर्गाचा रक्षक व पूजक होता . निसर्गातील अनेक घटकांना त्याने आपला मित्र मानले तर पृथ्वीला माता मानले . निसर्गातील वेली वृक्ष पशुपक्षी पाणी प्राणी जाती इ . बद्दल मानवाने पूज्य भाव ठेवला होता . पण आधुनिक मानवाने आपल्या स्वार्थासाठी त्याने निसर्गाचे शोषण सुरू केले . पर्यावरणातील घटकांचा समतोल बिघडवला परिणामी अनेक पर्यावरणाच्या समस्या निर्माण झाल्या . या समस्यांची जाणीव आज पर्यावरणवादी करून देत आहेत . मानवानेपर्यावरणाच्या समस्येचा अभ्यास करून शाश्वत विकासासाठी योग्य नियोजन व त्याचा आवलंब करण्यासाठी पर्यावरणाचा अभ्यास सुरू केला . विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यावरणाविषयी ची जाणीव जागृत अनेक विचारवंतांनी व पर्याणवादयांनी करून दिली . मानव प्राणी व वनस्पती आणि एकूणच निसर्ग हा मानवासाठी साधनरूप आहे . त्यांनी साध्यमुल्य नाही प्राण्यांना मानवाप्रमाणे हक्क नाही त्यांच्या जवळ विवेक नाही त्यामूळे मानवेत्तर प्राण्यांना व वनस्पतींना कर्तव्य व हक्क हया नैतिक गोष्टी लागू होत नाही तसेच मानवेत्तर अस्तित्व असणा –यात निसर्गातील विविध घटकांना चांगले व वाइट असे म्हाणता येत नाही त्यामूळे त्यांचे अस्तित्व नीतीच्या संकल्पनेत बसते की नाही तसेच मानवावर या निसर्गाचा समतोल राखण्याची काही नैतिक जबाबर्दाया नाहीत कात्र विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या मानवकेंद्री नीतीच्या संकल्पनेस जबर धक्का बसला . पिटर सिंगर या तत्ववेत्याने कृष्णवर्णीय माणसांची मुक्ती चळवळ व स्त्री मुक्ती चळवळ यांच्या धरतीवर मानवेत्तर वन्यजिव प्राण्यांची मुक्तीचळवळ सुरू झाली पाहिजे हा विचार त्याने १९७३ मध्ये मांडला . कारण पर्यावरणाशी एकंदर जीवसृष्टीचा संबंध दोन प्रकारचा येतो . पहिल्या प्रकारात जीव हे भोवतालच्या निसर्गाला तो आहे तसा स्वीकारून त्याच्याशी जुळवुन घेतात . यात प्रदुषणाची शक्यताच नसते . झालीचतर जीवात उत्क्रांती होते . दुर्सया प्रकारात मात्र जीव सभोवतालच्या परिसरात आपापल्या क्षमतेप्रमाणे परिवर्तन घडवुन आणतो . (उदा . घरटे किंवा बीळ तयार करणे)पण हे परिवर्तन गरजेशी निगडीत असते . विशिष्ट साधनसामग्रीवर आवलंबुन असते आणि सहजप्रेरणांनी नियंत्रीत असते त्यामूळे हे परिवर्तन मर्यादित प्रमाणात होते . उपलब्ध सामग्रीचाच उपयोग होत असल्याने ते निसर्गाची लय बिघडवत नाही . सहजप्रेरणाधीन जीवनात गरजेपेक्षा जास्त उपभोग नव्या गरजा अनावश्यक संचय व नासधुस यांना स्थानच नसते आयुमर्यादा आणि संख्या यांच्यावरही पुर्णतः निसर्गाचे नियंत्रण असते त्यामुळे परिणामात्मकदृष्टयाही प्रदुषणाची शक्यता नसते .

प्राचीन काळीन मानसुध्दा निसर्गाचा रक्षक व पुजक होता . तो उदरनिर्वाहासाठी सर्वस्वी निसर्गावर अवलंबुन होता . म्हणुन तो निसर्गातल्या शक्तींना पुजीत असे प्रार्थीत असे अळवित असे . आपल्या टोळीच्या कुळाच्या जमातीच्या खास रक्षणकर्त्या पालनपोषणकर्त्या शक्तिमान देवता म्हणुन काही प्राण्यांची तो मोठया भक्तिभावाने निगा राखित असे . म्हणुन एकंदरीत प्राचीन कालीन मानव व प्राणी हे निसर्गाचे रक्षण व संवर्धन करणारे होते . पण आज मात्र आधुनिकीकरणाने सर्वच संदर्भ बदललेले आपण पाहात आहोत मानवाने आपल्या विकासासाठी निसर्गाला आपल्या वेठीस धरल्याचे आपण पाहातो व यातुन दिवसेन दिवस पर्यावरणाचा –हास मानवाच्या अर्थिक प्रगतीचा स्त्रोत बनल्यामूळे आज निसर्गातील जे दोन घटक जैविक व अजैविक घटकांचा संबंध हा विळया भोपळयासारखा झाला आहे . आजच्या मानवाने संतांचे विचारच पायदळी तुडविल्याचे आपण पाहतो निसर्गाच्या संवर्धनासाठी संत तुकाराम म्हणतात “वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती” तर ज्ञानेश्वर महाराज म्हणतात ‘हे विश्वची माझे घर”हे विचार अल्डो लिओपोल्ड च्या विसाव्या शतकात मांडलेला परिवर नीतीचा हा दृष्टिकोन वैदिक ऋषीनी व संतानी मांडल्याचे विचारात दिसुन येते .

## आल्डो लिओपोल्ड ची परिवार नीती (Deep Ecolagy)

**१ . परिवार नीतीची उपपत्ती ः** आल्डो लिओपोल्डची उपपत्ती आल्डो लिओपोल्ड परिवार नीतीचा जनक म्हाणुन ओळखला जातो . पर्यावणाच्या झालेल्या –हासाबद्दल तो दुःखी होता म्हणुन त्याने जैविक समुदायाची वा परिवार नीतीची संकल्पना मांडली .

नीतीशास्त्र हे एका गृहीतावर आधारलेले आहे . व्यक्ती ही परस्परावलंबी घटकांच्या समुदाय रूप समाजाचा एक घटक आहे . व्यक्ती ही कुटूंबात जन्माला येते . ती समाजात राहते . तिचा वेगवेगळया अंगानी समाजात विकास होतो . कुटूंब हा एक घटक आहे . या गृहीतावर आधारीत लिओपोल्ड यांनी परिवार नीतीची उपपती मांडली . इंग्रजीत त्यास Land Ethics असे म्हणतात तर संस्कृतमध्ये “वसुदैव कुटूंबकम” असे म्हणतात . परिवार नीतीला अभिप्रेत असलेला ‘परिवार’ हा शब्द केवळ मानवी समाज नाही किंवा मानव व मानवेत्तर प्राणी एवढयापुरताच परिवार हा शब्द मर्यादीत नाही .

परिवार नीती जैविक (Biotic) घटक आणि अजैविक (Abiltic) घटक याचा समावेश होतो . जैविक घटकामध्ये मनुष्येत्तर प्राणी जसे कीटक पशुपक्षी जीवजंतु वनस्पती इ . घटकांचा समावेश हा जैविक घटकांमध्ये होतो . तर अजैविक घटकामध्ये पृथ्वी सुर्य चंद्र तारे नदया डोंगर खडक दगड रस्ते उदयोगधंदे हवा पाणी अग्नी प्रकाश इ . चा समावेश होतो . परिवार नीतीत जमीन हवा पाणी प्रकाश वनस्पती प्राणी आणि मानव या सर्व जैविक व अजैविक घटकांचा समावेश होतो . या व्यापक परिवारातील सर्व घटकांबाबत व्यक्ती मानवाची काही कर्तव्य व जबाबदा–या आहेत . त्यात आपले सर्व कुटूंबीय शेजारी पाजारी शेतीसाठी उपयोगी पडणारे पाळीव प्राणी कामासाठी उपयोगी पडणारे मनुष्यबळ व इतर सर्व जैविक आणि अजैविक अशा घटकांचा परिवारनीती हा एक मिश्र परिवार आहे . या सर्व जैविक व अजैविक घटकांना परिवार नीतीत स्थान दिले जाते . पृथ्वी हे एक मोठे घर आहे . आपण ज्या पृथ्वीवरील घरात नांदत आहोत ती पृथ्वी आणि तिचा परिसर यांच्यात समतोल राखणारी आणि पर्यावरणाचा समतोल राखणारी जीवनप्रणाली ही परिवार नीती होय . (Land Ethics)या संदर्भात आल्डो लिओपोल्ड म्हणतो की ही पृथ्वी एक जैविक परिवार वा समुदाय आहे . (Biotic Community) आहे . ज्यामुळे जैविक परिवाराची एकात्मता समतोल आणि सौंदर्य आणि स्थिरता राखली जाते . ती गोष्ट योग्य होय . या उलट ज्यामुळे जैविक परिवाराची एकात्मता समतोल आणि सौंदर्य आणि स्थिरता ही ढळते ती गोष्ट अयोग्य होय . नैतीक मुल्य ठरविण्याचा अंतिम निकष हे परिवाराचे हित आणि स्वास्थ संवर्धन करणे आहे . म्हणुन परिवारनीती ही उपपती नैतीक एकात्मवादी आहे . (Ethical holism) प्राचीन भारतीय वैदीक ऋषीनी व अनेक संतांनी परिवार नीतीचा साकल्यानेविचार केलेला दिसुन येतो . वैदिक ऋषींनी निसर्गातील जैविक व अजैविक घटकाना मित्र संबोधले आहे . अनेक घटकाप्रती त्यांनी पुज्य भाव व्यक्त केला आहे . वैश्वीक नैतीक नियम म्हणुन नैतिक सदाचाराचे आचरन करावयास लावणारी ऋत ही संकल्पना पर्यावरण नीतीशी संबंधीतच अशी संकल्पना विकसीत केली . संत तुकारामांनी “वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे पक्षीही सुस्वरे आळविती”तर ज्ञानेश्वर महाराज म्हणतात ‘हे विश्वची माझे घर” असा करून एकात्मवादी दृष्टीकोन मांडला लिओपोल्ड ने विसाव्या शतकात मांडलेला परिवार नीतीचा हा दृष्टीकोन

वैदीक ऋषींनी व संतानी मांडलेला दिसुन येतो . आपली भारतीय संस्कृतीत निसर्गाची पुजा प्राणीपुजा ही कृतज्ञेच्या भावनेतुन निर्माण झालेली आहे . निरनिराळे उत्सव व सण यातुन ती साजरी केली जाते . हा दृष्टिकोन निसर्ग व मानव यांच्यातील अव्दैत संबंध विकसित झालेला दर्शवितो . पर्यावरन नीतीत माझ्याप्रमाणेच इतरांनाही जगण्याचा हक्क आहे . हे इतर जन म्हणजे जीसृष्टी असुन पर्यावरनाचा एक अविभाज्य भाग आहे . म्हणुन नीतीची संकल्पना केवळ मानवापुर्तीच मर्यादीत न ठेवता ती जीवसृष्टी व अजीवसृष्टी यांच्या पर्यंत ती विस्तृत करता येते परंतु हा सर्व विचार अधुनिक विसाव्या शतकात अधिक विस्तृत व व्यापक झाला . केवळ मानवकेंद्री नीती न राहाता ती संपूर्ण विस्वाला गवसणी घालणारी नीतीची संकल्पना अलीकडच्या काळात विकसित झाली . पाश्चात्य नितीविषयक विचारत झालेला हा क्रांतीकारक बदल आहे . विशेषतः टॉम रिगन कांट लिओपोल्ड अर्ननेस सुंदरलाल बहुगुणा अण्णा हजारे व वैज्ञानिक पर्यावरणवादी शास्त्रज्ञ यासर्वांनी पार्यावरन नीतीविषयक जाणीव व जागृती करण्याचे काम २० व्या शतकाच्या उत्तरार्धात सूरू केलेले आहे . परिवारनीती ही संपुर्ण विश्वामध्ये किंवा सृष्टिमध्ये संतुलन राखणारीव समंजस्य निर्माण करणारी एक साम्यावस्था दर्शविणारी विचारसरणी आहे . ऑल्डो लिओपोल्ड यांनी निसर्गाची पिळवणुक करणारी व पृथ्वीवरील जैविक व अजैविक घटकांची नाश करणारी जीवनदृष्टी टाकून देवुन पर्यावरणाचे स्वास्थ्य व संवर्धन वा रक्षण करणारी व निसर्गाशी सुसंवाद साधणारी पर्यावरणकेंद्री जीवनसृष्टी (Ecocentric perspective) विकसीत करावयाला हवी असे परिवारनीतीत त्यांनी स्पष्ट केले आहे .

## २.सखोल पर्यावरण नीतीची उपपती

(Deep ecology)आर्ने नेस

आर्ने नेस प्रणित सखोल पर्यावरण नीती (Deep ecology)

आधुनिक पाश्चात तत्त्वेत्यांनी पर्यावरण नीतीच्या कक्षा विस्तारीत करून पर्यावरण नीतीच्या विचाराच्या कक्षा रूंदवल्या . टॉम रिगन याने हक्क संकल्पना आणि कांटची साध्यमुल्य संकल्पना या दोन्ही संकल्पना प्राण्यांना लावल्या . ज्याप्रमाणे प्रत्येक मनवाला जगण्याचा हक्क आहे . प्रत्येकाला आपले जीवन हे साध्यमुल्य आहे असे टॉम रिगने सांगितले अशा प्रकारे नीतीची संकल्पना अधिक विस्तारीत करण्याचे कार्य आर्ने नेस यांने सखोल पर्यावरण नीतीच्या उपपतीत मांडली इंग्रजीत त्यास (Deep ecology) असे म्हणतात . आर्ने नेसच्या मते माणुस केवळ मानव समाजाचा घटक नसून तो संपुर्ण विश्वाचा घटक आहे . व्यष्टी आणि सम्ष्टीशी मानवी विश्वाशी एकरूप आहे . जीवसृष्टीचा पर्यावणाशी असलेला संबंध यांचा अभ्यास करणारी शास्त्र म्हणजे पर्यावरण शास्त्र (Ecology) होय . (Ecology)हा शब्द ई . एच . हेकेल यांनी आणला . त्याचा शास्त्रशुध्द अभ्यास पेट्राइडस यांनी केला परंतू पर्यावरण नीतीच्या अंगाने हा अभ्यास २० व्या शतकाच्या उत्तरार्धात अभ्यास सुरू झाला पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मानसाने कोणती मुल्य स्विकारावी मानवाने पर्यावरणाचे संवधन करण्यासाठी कोणती जीवन प्रणाली स्वीकरावी याचा विचार पर्यावरणशास्त्र करीत नाही . तर याचा विचार पर्यावरण नीती(Enviourment of Ethics)करते . पर्यावरणशास्त्र आणि पर्यावरणनीती यामध्ये मुलभूत फरक आहे . पर्यावरणशास्त्राचा विचार हा वरवरचा अभ्यास करणारा आहे . तर पर्यावरणनीतीचा विचार हा सखोल आहे . (Deep ecology) पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मानवी समाजाने कोणती नीतीतत्वे स्वीकारावीऋ मानवी समाजाने कोणती जीवनदृष्टी स्वीकारावीऋपर्यावरण केंद्री दृष्टीकोन ठेवून कोणती मुल्य आत्मसात करावी ? या प्रश्नांची उत्तरे ज्या विचाराव्दारे दिली जातात त्याला सखोल पर्यावरण नीती असे म्हणतात किंवा पर्यावरण प्रज्ञा विचार विवेक असेही म्हणतात आर्ने नेस यांनी मांडलेल्या सखोल पर्यावरण नीतीच्या उपपत्तीचे वैशिष्टय म्हणजे पर्यावरनाच्या समस्या या नैसर्गिक साधन संपत्ती अपुरी असल्यामूळे निर्माण झालेली समस्या नाही तर माणसाने आपल्या आर्थिक प्रगतीसाठी आधिकाअधिक सुखोपयोग मिळविण्यासाठी तो पर्यावरणाचा भोवतालच्या परिसराचा नाश करू लागला . तो झाडे तोडु लागला कारखानदारी निर्माण केल्यामुळे वायुचे प्रदुषण झाले तसेच अनेक गोष्टीमुळे माणवाने प्रदुषणाच्या समस्या निर्माण केल्या त्याचा निसर्गाशी असलेला सुसंवाद एकात्मभाव प्रेम व आदरभाव याकडे त्याने दुरलक्ष केले . त्यामुळे अनेक पर्यावरणाच्या समस्या निर्माण झाल्या . त्या जल प्रदुषण वायु प्रदुषण ध्वनी प्रदुषण भु संधारण जमिनीची धुप शेतीला रासयनिक खते वापरणे उदयोगधंदे उभारणे वृक्ष तोड करणे वनानां आगी लावणे दाट वस्त्या रस्ते रोगराई लोकसंखेमूळे व अवर्षनामूळे निर्माण झालेली पाणीटंचाई अन्नटंचाई इ . पर्यावरणाच्या समस्येमूळे मानवाचे अस्तित्व धोक्यात आले आहे . मनुष्य पर्यावरणाचे शोषण करू लागला तो पर्यावरणाचा रक्षक न राहता तो त्याचा भक्षक बनला . पर्यावणाप्रती दुष्ट प्रवृत्तीने मनुष्य वागु लागल्यामूळे प्रदुषण हे त्याच्या कुकर्माचे किंवा दुर्मतीचे दुर्बुद्धीचे धोतक आहे . आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्या पृथ्वीला विनाशातून वाचवायचे की नाही पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने जीवन पध्दती बदलायची की नाही या प्रश्नांची उत्तरे दिला पृथ्वीला वाचावण्यातुन प्रगती आहे . पर्यावरणाचा समतोल राखण्यात जीवनदृष्टी आहे . तशा प्रकारची जीवनमुल्ये आपल्याला स्वीकारावी लागते . म्हणुन निसर्गाची पिळवणुक करणारी पृथ्वीचा नाश करणारी जीवनदृष्टी टाकुन देवुन निसर्गाशी सुसंवाद साधुन पर्यावरणाचे रक्षण करणारी पर्यावरण केंद्री (Ecocentric perspective) जीवनदृष्टी विकसितकरावयाला हवी असे आर्ने नेस यांचे म्हणणे आहे .

पर्यावरण नीतीत अनेक तत्वे सांगितली जातात . त्यातील १ . पहिले तत्वे म्हणजे प्रत्येक जीवाला जीवंत राहण्याचा आणि आपले जीवन आनंदीत करण्याचा हक्क आहे . तर २ . दुसरे तत्वम्हणजे जीवण जगण्यासाठी हिंसा ही अटळ आहे . हे मान्य करूनही आपल्या इतर जीवांची हिंसा करण्याचा हक्क नाही . तर ३ . तिसरे तत्व म्हणजे इतर जीवाच्या सुखाने सुखी होणे तर इतरांच्या दुःखाने दुःखी होणे असे पर्यावरण नीतीची काही तत्वे आहेत . आर्ने नेस ने आपल्या पर्यावरण नीतीच्या चळवळीची काही तत्वे निशद केली .

१ पृथ्वीवरिल माणवी आणि माणवेत्तर जीवांचे स्वास्थ्य विकास यांना स्वतःचे साध्यमुल्य आहे त्यांनाही जीवन जगण्याचा हक्क आहे त्याचे मुल्य मानवाला किती उपयुक्त आहेत यावर आवलंबुन नाही . कारण त्यानाही स्वतःचे धेय व मुल्य असतात .

२ मानवाला स्वतःच्या जैविक गरजा भागविण्यासाठी इतर कोणत्याही कारणासाठी निसर्गातील घटकावर अवलंबुन राहवे लागते . या मुलभुत गरजा व्यतिरिक्त निसर्गातील विविधता आणि समृदधी नष्ट करण्याचा मानवाला हक्क नाही .

३ आर्न नेस यांनी आपल्या चळवळीतील या तत्वात असे सांगीतले की वरिल तत्वे ज्यांना मान्य आहेत त्यांनी प्रत्यक्ष ही तत्वे आमलात आणुन जीवनात आवश्यक ते बदल करण्याची जबाबदारी आहे . आशा प्रकारे आर्न नेसच्या मते पृथ्वी या ग्रहावरिल मानव हा एक छोटा घटक आहे . हे लक्षात घेऊन पृथ्वीवर निसर्गावर अधिराज्य गाजवन्याची व भोवतालच्या सृष्टीला स्वार्थासाठी वेठिस धरण्या ची प्रवृत्ती माणवाने सोडुन द्यावी . कारण ते घातक आहे . पृथ्वीवरिल पर्यावरन व निसर्ग यांचे रक्षण करून त्यांच्याशी सुसंवादी जिवनप्रणाली विकसित करण्यातच माणवाचे खरे हित आहे वा कल्याण आहे . म्हणुनच आर्न नेस म्हणतो की माणव केंद्री विचारांचा त्याग

करून पर्यावरणकेंद्री व समष्टीकेंद्री व जीवनदृष्टी विकसीत व्हावी तरच माणवाची खरी प्रगती आहे . जैविक व अजैविक आशि एकात्मीक मिश्रपरिवार केंद्रीय जीवन दृष्टी स्विकारून मानवाने ती आचरनात आनली पाहिजे असे लिओपॉल्ड यांची पर्यावरण नीती सांगते .

## सारांश :

आर्ननेस याने सखोल पर्यावरण नीतील माणवेत्तर जिवसृष्टीचा सखोल विचार करून त्यांनाही जीवन जगण्याचा हक्क आहे 'तुम्ही ही जगा इतरांनाही जगु द्या . ' हा संदेश आर्ननेसच्या सखोल पर्यावरण नीतीत दिसुन येतो . पर्यावरण शास्त्राच्या आभ्यासचा दृष्टीकोण हा उथळ असुन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी माणवाने कोणती निती तत्वे व जिवनदृष्टी स्विकारावी हा सखोल पर्यावरणनीतीचा विचार आर्ननेस याने मांडला आहे . पर्यावरणाचा समतोल विघडवनारी जीवन पध्दती स्विकारण्यात प्रगती नाही पृथ्वीचा विनाश करणारी जीवन दृष्टी टाकुन निसर्गाशी सुसंवाद साधुन पर्यावरणाचे रक्षण करणारी पर्यावरण केंद्री जिवन दृष्टी विकसीत झाली तरच माणवाची खरी प्रगती आहे . कारण निसर्गातील प्रत्येक प्राणी मात्राला जसा जगण्याचा नैसर्गिक हक्क आहे तसेच त्याला स्वतःचेही साध्यमुल्य आहे . असा नीतीचा उतुंग विचार आर्न नेसच्या सखोल पर्यावरणनीतीमध्ये पाहावयास मिळते . आर्न नेस आणि लिओपोल्ड या आधुनिक पाश्चात परिसरिय तज्ञांचे विचार ज्ञानेश्वरादी संतानी व वैदिकांनी हजारो वर्षापासुन सांगीतले आहे . "हे विश्वची माझे घर" असे विचार सांगनारे संत ज्ञानेश्वर परिवारनीतीचा विचारही सांगुन जातात . वैदिकांनी त्यास 'वसुदैव कुटूंबकम्' असे म्हटले आहे . ज्ञानेश्वरानी सखोल पर्यावरणनीतीचा विचारही निसर्ग आणि माणव यांचा अव्दैत दृष्टीकोनातुन मांडला आहे .

## संदर्भ

१ . उपयोजीत नीतीशास्त्र ले . माधवी कवी .
२ . परामर्श पुणे विद्यापिठ प्रकाशन .
३ . वर्तमानपत्रे .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org